**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278, www.srjis.com**
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, DEC-JAN, 2023, VOL-11/55

# विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर स्वसंकल्पना व सर्जनशीलतेचा होणारा परिणाम-एक तुलनात्मक अभ्यास

**श्रीमती मीना शेंडकर**
*संशोधक विद्यार्थीनी, सेवासदन शिक्षणशास्त्र महाविद्यालय, उल्हासनगर- 421 003.*

**Paper Received On:** 25 JAN 2023
**Peer Reviewed On:** 31 JAN 2023
**Published On:** 1 FEB 2023

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

दैनंदिन जीवनात व्यक्तिमत्व हा शब्द आपण दुस-या व्यक्तीचे वर्णन करण्यासाठी वापरतो.एखादा उंचपुरा, गोरा-गोमटा, धडधाकड, पाणीदार डोळे असलेला रूबाबदार तरूण दिसला की, आपण चटकन म्हणतो काय व्यक्तिमत्व आहे. परंतु ठेंगु, किडकिडीत, जाड भिंगाचा चष्मा वापरणारा, रंगाने काळा असा माणूस दिसला की, त्या व्यक्तीला व्यक्तिमत्व नाही असे आपण म्हणतो. व्यक्तीचे केवळ प्रथम दर्शनी दिसणारे रूप पाहून आपण त्याच्या व्यक्तिमत्वाबद्दल बोलतो. हे ठरवत असतांना त्याच्या अंगी असणा-या गुणदोषांचा थोडाही विचार आपण करीत नाही. आपल्या मनःपटलावर उमटणारा व्यक्तिमत्वाचा अभिप्राय फारच संकुचित वाटतो.

व्यक्तिमत्व या शब्दामध्ये ‘‘व्यक्त होणे’’ हा अर्थ अभिप्रेत आहे. यावरून व्यक्ती जे जे काही प्रकट करण्यासारखे आहे.ते ते सर्व प्रकट करते.त्यालाच व्यक्तिमत्व म्हणता येईल. हे व्यक्त होणे व्यक्तीच्या विचारातून, कृतीतून वा भाषेतूनही होवू शकेल.

सामान्य मनुष्य व्यक्तिमत्वाचा विचार केवळ बाहयांगानेच करीत असतो. असे आपल्याला लक्षात येईल. वस्तुतः मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून व्यक्तिमत्व हा शब्दप्रयोग इतक्या संकुचित अर्थाने केला गेलेला नाही. व्यक्तिमत्व या संज्ञेचा अर्थ मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून बराच व्यापक स्वरूपाचा आहे.मनुष्याच्या निरनिराळया परिस्थितींना अनुसरून काही वैशिष्टपूर्ण वागणुकीतून त्याच्या व्यक्तिमत्वाची घडण होत असते.

चार माणसे अनौपचारीक रूपाने जेव्हा एकत्रित येतात तेव्हा त्यांच्या वागण्या बोलण्यातून वेगवेगळी वैशिष्टे प्रकट होतात. या चारांपैकी एखादा आपल्या बोलण्यातून इतरांवर छाप पाडण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतो असे दिसते. तर दुसरा एखादा मनुष्य स्वतः काही बोलण्यापेक्षा इतरांचे म्हणणे ऐकून केवळ मान डोलवतो. तिस-या एखादयाची वृत्ती सर्वांशी जुळते घेण्याची असते. तर एखादा मनुष्य इतका हळव्या वृत्तीचा असतो की, इतरांकडून त्याच्या मताला थोडासाही विरोध झाला तर त्याचे फार दुःख वाटते. मनुष्याच्या

व्यवहारातून अशी वर्तन वैशिष्टये सातत्याने प्रकट होत असतात. ही वैशिष्टये अनेक रूपांनी आणि अनेक पध्दतींनी प्रकट होतात. म्हणजेच वर्तन वैशिष्टयांचे संश्लिष्टरूप प्रत्येकामध्ये वेगळेच दिसते. दोन माणसे शांत स्वरूपाची असली तरी त्यापैकी एकाचे वागणे प्रेमळ आणि सौहार्दयुक्त असेल तर दुसरा कमी बोलणारा परंतु कठोर स्वभावाचा असू शकेल. अशा विभिन्न गुणवैशिष्टयांनी युक्त व्यक्तीमत्वाची योग्य जडण घडण व्हावी या करीता आपण औपचारिक व अनौपचारिक पध्दतीने नवनवीन बाबी आत्मसात करीत असतो. औपचारिक पध्दतीने व्यक्तीमत्व विकसावर शिक्षणाचा प्रभाव पडलेला आपणास दिसून येतो. शिक्षण प्रक्रियेमध्ये व्यक्तीमत्वाचा विचार करावा लागतो. तरच ख-या अर्थाने शिक्षण देण्यास योग्य संधी निर्माण होते.

शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकीय ज्ञान मिळवणे नव्हे तर व्यक्तीमत्वाचा विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. परंतू शिक्षणाचे हे ध्येय पुर्ण करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासाला चालना मिळाली पाहिजे. परंतू प्रत्येक व्यक्ती ही सारखी नसते. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तीमत्व सारखे नसते. परंतु विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडविणे हे शिक्षकाचे कार्य आहे. त्यासाठी शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा अभ्यास करावा लागेल. तसेच त्यांचा विकास होण्यासाठी शिक्षकांना प्रयत्न करावे लागतील व त्यासाठी विद्यार्थ्यांना चाचणीव्दारे पडताळणी करणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तीमत्व वेगळे असते त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्ती ही सर्जनशील असते.तीच्या सर्जनशीलतेचा विकास होणे सुध्दा गरजेचे आहे. तसेच प्रत्येक व्यक्तीमधून  सर्जनशील विचार व्यक्त होण्यास प्रवृत्त करणे हे शिक्षकाचे आद्य कर्तव्य आहे.

सर्जनशीलता

नवनिर्मितीक्षम विचार म्हणजेच सर्जनशील विचार होय. संपन्न अनुभव प्रदीर्घ वैचारिक बैठक व नावीन्याचा वेध घेण्याची उर्मी “ असे पैलू सर्जनशील विचारामध्ये आढळतात. नवनिर्मितीस प्रवृत्त करणारा हा विचार विधायक स्वरूपाचा असून त्यामुळे ज्ञानात भर घातली जाते. प्रतिभा संपन्न व्यक्तीचे विचार हे सर्जनशील विचार असतात.

परंतु समाजातील सर्व व्यक्ती सर्जनशील असतातच असे नाही. या सर्जनशीलतेची क्षेत्रेही वेगवेगळी आढळतात. उत्कृष्ठ साहित्यिक रचना, कर्णमधूर संगिताची रचना, अत्यंत देखणी चित्रे, अप्रतिम कलाकृती, जगप्रसिध्द वास्तुनिर्मिती, एखादा संशोधक की ज्याचे संशोधन अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे आहे. या सर्वांची निर्मीती म्हणजे सर्जनशीलतेचा अविष्कार होय. सर्जनशील विचार प्रक्रियेची उकल करून पाहिली तर त्यात विचारांची गुंफण आणि पुर्नमांडणी आढळते.

सर्जनशीलता ही केवळ नवनिर्मिती पुरतीच मर्यादी प्रक्रिया नसून ती एक जीवनव्यापी प्रक्रिया होय. विश्वाची निर्मिती हेच मुळी एक महान सर्जनशील काम आहे. सर्जनशीलतेचा अवलंब ही एक जीवन पध्दती

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

आहे. सर्जनशीलता व्यक्तीमत्वाचा अंगभूत घटक आहे. संपुर्ण व समृध्द जीवनाचा एक अनिवार्य भाग आहे.विचार शक्तीचा वापर केला म्हणजे माणूस म्हणून जीवन सफल झाले असे म्हणता येणार नाही. व्यक्तीमत्वाचा संपुर्ण विकास होण्यासाठी परिपुर्ण जीवन जगण्यासाठी सर्जनशीलतेची नितांत गरज असते. सर्जनशीलतेच्या माध्यमातूनच व्यक्ती आपल्या सर्व सुप्त शक्तींचा विकास करून आत्मपुर्ती व आत्मविकास साधू शकते. अशा प्रकारे पुर्ण विकसित व्यक्तीमत्व परिपुर्ण जीवन जगू शकते.

स्व-संकल्पना

मानवी जीवनामध्ये व्यक्तिमत्व विकासात स्वसंकल्पनेला वा स्व-जाणिवेला महत्वाचे स्थान आहे. एखादया व्यक्तीची प्रगती होईल किंवा नाही हे त्या व्यक्तीची स्वतः विषयीची जाणीव सकारात्मक आहे की नकारात्मक आहे. यावर अवलंबून असते. तसेच एखादया समुहाची वा समाजाची प्रगती त्यात कार्यरत असणा-या व्यक्तींच्या स्वसंकल्पनेवर अवलंबून असते. व्यक्ती केवळ सभोवतालच्या उद्दीपकांना प्रतिसाद देते असे नाही, तर आपले शरीर विचार व भाव-भावना यांना अनुसरून देखील प्रतिक्रिया देत असते या होणा-या क्रिया प्रतिक्रियामधून प्रत्येक व्यक्तीची स्व-संकल्पना विकसित होते.

शोध निबंध विषयाची गरज

आजच्य मानवी जीवनात शिक्षणाला एक महत्वाचे स्थान आहे. शिक्षण देण्याचे कार्य शाळा, महाविद्यालय तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालय इत्यादी मधून होत आहे. आजच्या या शिक्षणात स्वतंत्र विचारशक्ती शोधप्रवृत्ती, कल्पनाशक्ती, नवनिर्मिती या सारख्या मानसिक क्षमतांना अल्प असा वाव दिसून येतो. आजच्या शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या हातून नवनिर्मीती व्हावी ही अपेक्षा असते परंतु या विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला पाहिजे तेवढी चालना मिळत असल्याचे दिसत नाही. विद्यार्थ्यांच्या अंगी नवनिर्माण क्षमता वाढावी त्यांचा परिपूर्ण व्यक्तिमत्व विकास व्हावा, आनंददायी जीवन सहजपणे जगता यावे. यासाठी या संशोधन विषयाची गरज निर्माण झाली आहे.

शोध निबंधाचे महत्व

संतुलीत व्यक्तीमत्व तयार करण्यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे. त्यासाठी सर्जनशीलता व स्वसंकल्पना यांची ओळख होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमधील सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासावर सर्जनशीलता व स्वसंकल्पना यांचा काय परीणाम होतो हे जाणून घेणेसुध्दा महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांना स्वतःची जाणीव करून देण्यासाठी तसेच त्याच्या नवीन विचाराला चालना देण्यासाठी संशोधन महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांना स्वतःची जाणीव ही शिक्षण घेत असतांनाच झाली पाहिजे, विद्यार्थ्यांचा

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

संपुर्ण व्यक्तीमत्व विकास होऊ शकतो, यासाठी शिक्षकांनी वेगवेगळया मार्गाचा अवलंब करून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता जाणून घेतली पाहिजे तसेच विद्यार्थ्यांना स्वतःची ओळख करून घेण्यास मदत केली पाहिजे तरच त्यांच्या स्वसंकल्पना जागृत होतील. याकरीता स्वसंकल्पना व सर्जनशीलता आणि व्यक्तीमत्व यांचा परस्पर काय संबंध आहे यावर विचारमंथन होणे आवश्यक आहे. असे संशोधिकेचे मत आहे.

“विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर स्वसंकल्पना व सर्जनशीलतेचा होणारा परिणाम- एक तुलनात्मक अभ्यास. ”

शोध निबंधाची उद्दिष्टे:

१) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर स्व-संकल्पनेच्या होणा-या परिणामाचा आढावा घेणे.

२) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर सर्जनशीलतेच्या होणा-या परिणामाचा आढावा घेणे.

३) व्यक्तिमत्व विकास, स्व-संकल्पना व सर्जनशीलता यांच्या परस्परसंबंधाची तुलना करणे.

शोध निबंधाची चले :

१. स्वाश्रयी चल

स्व-संकल्पना व सर्जनशीलता

२. आश्रयी चल

विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास.

शोध निबंधाची परिकल्पना

१) विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासावर स्व-संकल्पनेचा व सर्जनशीलतेचा परिणाम होत नाही.

शोध निबंधाची व्याप्ती व मर्यादा

व्याप्ती

१) प्रस्तुत संशोधनात पुणे जिल्हयातील शाळांचा समावेश करण्यात आला आहे.

२) प्रस्तुत संशोधनात इ.९ वी च्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

मर्यादा

१) प्रस्तुत संशोधन हे पुणे जिल्हातील हवेली तालुक्यापुरतेच मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे इ.९ वी च्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

संशोधन पध्दतीची निवड

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पध्दती वापरून प्रश्नावलीचा वापर केलेला आहे. त्यामध्ये अतिशय काळजीपूर्वक प्रमाणित चाचण्या वापरण्यात आलेल्या आहेत. (डॉ.आर.के.सारस्वत- स्व संकल्पना प्रश्नावली,

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

व्यक्तीमत्व शोधिका प्रश्नावली, विद्यार्थ्याची समायोजन प्रश्नावली ) नमुना निवड ही सुध्दा शास्त्रीय पध्दतीने दिलेल्या विविध पध्दतीचा वापर करूनच करण्यात आलेली आहे.त्यामुळे सर्जनशीलता, स्वसंकल्पना व व्यक्तीमत्व यांचा परस्पर संबंध शोधण्यास मदत झाली आहे.

संशोधनासाठी निवडलेला न्यादर्श

प्रस्तुत संशोधनात सुगम यादृच्छिक पध्दतीचा वापर करून न्यादर्शाची निवड केली आहे. कोणत्याही प्रकारचा पक्षपात न होता जनसंख्या घटकाला न्यादर्शात अंर्तभूत होण्याची समान संधी मिळणे याला यादृच्छिक म्हणतात. यादृच्छिकतेच्या निकषानुसार केलेल्या न्यादर्शाला यादृच्छिक म्हणतात. प्रस्तुत संशोधनात पुणे जिल्हयातील हवेली तालुक्यातील बी.जे.एस.हायस्कूल व महात्मा गांधी हायस्कूल या २ शाळांची निवड सुगम यादृच्छिक पध्दतीने करण्यात आली. निवडलेल्या माध्यमिक शाळेतील इयत्ता ९ वी मध्ये प्रत्येक शाळेतील १०० विद्यार्थी सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा अवलंब करून निवडण्यात आले आहेत.

संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनासाठी माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्योचा व्यक्तीमत्व विकास सर्जनशीलता व स्वसंकल्पना यांचा अभ्यास करण्यासाठी प्रमाणित चाचणी या साधनाचा उपयोग करण्यात आलेला आहे. स्वसंकल्पना अभ्यासण्यासाठी राज कुमार सारस्वत यांच्या चाचणीचा वापर तर व्यक्तिमत्वाचा अभ्यास करण्यासाठी “ Personality Inventory ” चा वापर करण्यात आलेला आहे. हया चाचण्या ज्ञान प्रबोधिनी संस्था, पुणे हयांनी प्रमाणित केल्या आहेत. तसेच सर्जनशिलतेचा अभ्यास करण्यासाठी व्ही.पी.शर्मा व जे.पी.शुक्ला यांच्या प्रमाणित चाचणीचा वापर करण्यात आला आहे.

माहिती विश्लेषणासाठी सांख्यिकीय तंत्राची निवड

**सारणी क्रमांक १**

**व्यक्तिमत्व विकास व स्व-संकल्पना यांच्या प्राप्तांकातील तुलना दर्शविणारी सारणी**

| विद्याथी गट | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त t मुल्य | स्वाधीनता मात्रा | तक्त्यावरून t मूल्ये | | सार्थकता स्तर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व्यक्तिमत्व विकास | १०० | ३७.८३ | ६.४५ | ०.३८ | ३७१.६ | १९८ | ०.०५ | ०.०१ | ०.०५ | ०.०१ |
| स्व संकल्पना | १०० | १७९.०७ | १०.४७ | | | | १.९६ | २.५८ | सार्थक | सार्थक |

$df = (N_1-1) + (N_2-1)=(100-1)+(100-1)=99+99=198$

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, व्यक्तिमत्व विकासाचे मध्यमान ३७.८३ इतके असून स्व-संकल्पनेचे मध्यमान १७९.०७ आहे. स्वाधिनता मात्रा १९८ असतांना, ०.०१ सार्थकता स्तरावर सारणी t मूल्य

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

२.५८ आहे. तसेच ०.०५ सार्थकता स्तरावर सारणी t मूल्य १.९६ आहे. परंतु प्राप्त t मूल्य ३७१.६ आहे. प्राप्त t मूल्य हे सांख्यिकीय सारणीच्या ०.०१ सार्थकता स्तरावरील सारणी t मूल्य २.५८ पेक्षा व सांख्यिकीय सारणीच्या ०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी t मूल्य १.९६ पेक्षा अधिक असल्यामुळे व्यक्तिमत्व विकास व स्व-संकल्पना यांच्या प्राप्तांक मध्यमानातील फरक सार्थक आहे. व्यक्तिमत्व विकासावर स्व-संकल्पनेचा प्रभाव अधिक प्रबळ असलेला दिसून येतो.

**सारणी क्रमांक २**

**व्यक्तिमत्व विकास व सर्जनशीलता यांच्या प्राप्तांकातील तुलना दर्शविणारी सारणी**

| विद्यार्थी गट | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त t मुल्य | स्वाधीनता मात्रा | तक्त्यावरून t मूल्ये | | सार्थकता स्तर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व्यक्तिमत्व विकास | १०० | ३७.८३ | ६.४५ | ०.४२ | ५७.८ | १९८ | ०.०५ | ०.०१ | ०.०५ | ०.०१ |
| सर्जनशीलता | १०० | ६२.१४ | ११.८४ | | | | १.९६ | २.५८ | सार्थक | सार्थक |

df = $(N_1-1) + (N_2-1)=(100-1)+(100-1)=99+99=198$ df = 198

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, व्यक्तिमत्व विकासाचे मध्यमान ३७.८३ इतके असून सर्जनशीलतेच मध्यमान ६२.१४ आहे. स्वाधिनता मात्रा १९८ असतांना, ०.०१ सार्थकता स्तरावर सारणी t मूल्य २.५८ आहे. तसेच ०.०५ सार्थकता स्तरावर सारणी t मूल्य १.९६ आहे. परंतु प्राप्त t मूल्य ५७.८ आहे. प्राप्त t मूल्य हे सांख्यिकीय सारणीच्या ०.०१ सार्थकता स्तरावरील सारणी t मूल्य २.५८ पेक्षा व सांख्यिकीय सारणीच्या ०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी t मूल्य १.९६ पेक्षा अधिक असल्यामुळे व्यक्तिमत्व विकास व सर्जनशीलता यांच्या प्राप्तांक मध्यमानातील फरक सार्थक आहे. व्यक्तिमत्व विकासावर सर्जनशीलतेचा प्रभाव अधिक प्रबळ असलेला दिसून येतो.

**सारणी क्रमांक ३**

**व्यक्तिमत्व विकास संदर्भात सर्जनशीलता व स्व-संकल्पना यांच्या प्राप्तांकातील तुलना दर्शविणारी सारणी**

| विद्यार्थी गट | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त t मुल्य | स्वाधीनता मात्रा | तक्त्यावरून t मूल्ये | | सार्थकता स्तर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्जनशीलता | १०० | ६२.१४ | ११.८४ | ०.७१ | १६५.५ | १९८ | ०.०५ | ०.०१ | ०.०५ | ०.०१ |
| स्व संकल्पना | १०० | १७९.०७ | १०.४७ | | | | १.९६ | २.५८ | सार्थक | सार्थक |

df = $(N_1-1) + (N_2-1)=(100-1)+(100-1)=99+99=198$

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, व्यक्तिमत्व विकास संदर्भात सर्जनशीलतेचे विद्यार्थ्याचे मध्यमान ६२.१४ इतके असून स्व-संकल्पनेचे विद्यार्थ्याचे मध्यमान १७९.०७ आहे. स्वाधिनता  मात्रा १९८ असतांना, ०.०१ सार्थकता स्तरावर सारणी t मूल्य २.५८ आहे. तसेच ०.०५ सार्थकता स्तरावर सारणी t मूल्य १.९६ आहे. परंतु प्राप्त t मूल्य १६५.५ आहे. प्राप्त t मूल्य हे सांख्यिकीय सारणीच्या ०.०१ सार्थकता स्तरावरील सारणी t  मूल्य २.५८ पेक्षा व सांख्यिकीय सारणीच्या ०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी t मूल्य १.९६ पेक्षा अधिक असल्यामुळे व्यक्तिमत्व विकास संदर्भात सर्जनशीलता व स्व-संकल्पना यांच्या प्राप्तांक मध्यमानातील फरक सार्थक आहे. व्यक्तिमत्व विकास संदर्भात विद्यार्थ्यांची स्व-संकल्पना सर्जनशीलतेपेक्षा अधिक प्रबळ असलेली  दिसून येते.

प्रस्तुत शोध निबंध संशोधनात विद्यार्थ्यांच्या चाचणीव्दारा प्राप्त झालेल्या प्राप्तांकांच्या माहितीचे अर्थनिर्वचन करण्यासाठी t परीक्षिका या सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

शोध निबंधाचे निष्कर्ष

१. व्यक्तिमत्व विकास व स्व-संकल्पना यांच्या प्राप्तांकातील मध्यमानाचा फरक सार्थक आहे.

२. व्यक्तिमत्व विकास व सर्जनशीलता यांच्या प्राप्तांकातील मध्यमानाचा फरक सार्थक आहे.

३. व्यक्तिमत्व विकास संदर्भात स्व.संकल्पना व सर्जनशीलता यांच्या प्राप्तांकातील मध्यमानाचा फरक सार्थक आहे.

शोध निबंधाच्या शिफारशीः

१. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्व विकाससंदर्भात, स्व-संकल्पना व सर्जनशीलता अधिकाधिक विकास होण्यासाठी वर्ग अध्यापनात कृतीशिलतेला वाव दयावा

२. शाळा व्यवस्थापन शिक्षक मुख्याध्यापक यांनी शालेय व वैयक्तिक स्तरावर चर्चासत्रे आयोजित करावेत आणि मुलांना सहभागी होण्याकरिता प्रोत्साहन द्यावे.

३. शिक्षकांनी विविध प्रकारच्या अध्यापन पद्धतीचा उपयोग करावा सक्रिय सहभाग पद्धती उदा. कथाकथन पद्धत, नाट्यीकरण पद्धत, गटचर्चा पद्धत, क्रीडन पद्धत इत्यादी चा उपयोग करावा.

४. स्व-संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्याकरिता स्व-जबाबदारीची जाणीव करून द्यावी.

५. स्वयंशिस्त आदर विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावा या दृष्टिकोन मानवी घटकांची वर्तवणूक  असावी.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

६. विद्यार्थ्यांना आदरयुक्त वागणूक देऊन स्व-संकल्पना निर्माण करून स्व-आदर निर्माण करावा.

७. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होण्याकरिता सर्जनशीलतेसोबत स्व-सन्मानाची जोड द्यावी.

संदर्भसूची

*आहेरा हिरा (१९९५), '' उद्योजन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक'', नागपूर, विद्या प्रकाशन.*

*आगलावे, प्रदीप (२०००), ''संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे'', नागपूर विद्या प्रकाशन.*

*उपासनी, ना.के. कुळकर्णी के.वि. (१९९७). ''नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि शास्त्र'', पुणे, श्रीविद्या प्रकाशन.*

*कदम चा.प.(२००७), ''शखणिक संख्याशास्त्र'', पुणे , नित्यनूतन प्रकाशन.*

*कर्डिले वसंतराव, महाले संजीवनी (२०००), ''संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन '', नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.*

*कुलकर्णी डी.बी.ढमढेरे व्ही.एस.(२००७), '' अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती '' पुणे, डायमंड पब्लिकेशन्स.*

*घोरमोडे के.यु., घोरमोडे कला (२००८), '' शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे '', नागपूर, विद्या प्रकाशन.*

*जगताप ह.ना. (२००६), ''शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र'' , पुणे, नूतन प्रकाशन.*

*राणे एस.एस. (२००२), ''मानसशास्त्र'', जळगांवः प्रशांत पब्लिकेशन.*

*वीरकर प्र.क्र.गद्रे प्र.ध., सामंत द.गो.(१९६३), '' प्रायोगिक शैक्षणिक मानसशास्त्र'', पुणे : ठोकळ प्रकाशन.*

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*